**प्रेस नोट दिनांक ३०/०३/२०१९**

## वारजे माळवाडी पोलीस स्टेशन, पुणे शहर

## मिसिंग इसमाची मिसिंग तक्रार दाखल होण्यापूर्वीच मिसिंग इसमाचा शोध

दि ३०/०३/१९ रोजी पहाटे ०५.३० वा चे सुमारास इसम नामे श्री. रूपेश हसोळकर वय ४२ वर्ष रा. फ्लॅट नं ३, शिवाई बिल्डींग, कॅनॉल रोड, वारजे माळवाडी, पुणे हे नेहमी प्रमाणे मॉर्निग वॉक करीता घरातून बाहेर पडले. ते सकाळी ०६.०० वा चे सुमारास परत घरी येणे अपेक्षित होते. परंतु ते वेळेत घरी न आल्याने ब-याच वेळाने देखील घरी न आल्याने त्यांच्या पत्नी सौ अश्विनी हसोळकर यांनी त्यांच्या घराच्या आसपासच्या परिसरात त्यांच्या पतीचा शोध घेतला. परंतु त्यांचे पती मिळून आले नाही. श्री रूपेश हसोळकर यांनी त्यांचा मोबाईल फोन देखील घरातच ठेवला होता. तसेच त्यांच्या पतीचा सुमारे ५ वर्षापूर्वी अपघात झाला होता. तेव्हा पासून त्यांना उजव्या डोळयाने कमी दिसते व अधुनमधून चक्कर येत असते. म्हणून त्यांना त्यांचे पतीची काळजी वाटू लागल्याने त्यांनी त्यांच्या तळेगाव दाभाडे येथे राहणा-या मोठया भावाला फोन करून हकीकत कळवून बोलावून घेतले. त्यांचा भाऊ आल्यानंतर त्या दोघांनी श्री रूपेश हसोळकर यांचा वारजे, कर्वेनगर परिसरात शोध घेतला परंतु ते मिळून न आल्याने सरते शेवटी ते वारजे पोलीस चौकीस मिसिंग तक्रार देण्यास आले. वारजे चौकी अंमलदार पो.ना. अरूण किटे यांनी तक्रारीतील गांभीर्य ओळखून तात्काळ तक्रार लिहून घेतली व दाखल करणेकामी पोलीस ठाण्यास पाठवून दिली.

मिसिंग इसमाचा फोटो पो.ना. किटे यांनी वारजे परिसरातील व्हॉटस ॲपवर देऊन सदर इसम मिसिंग झाला असून माहिती असल्यास कळविणेबाबत आवाहन केले. त्यानंतर अर्ध्या तासात त्यांना फोनवर सदर मिसिंग इसम हा वारजे ब्रीज खाली असलेबाबत माहिती प्राप्त झाली. त्याप्रमाणे ते व पो.शि. नितिन कातुर्डे असे वारजे ब्रीज खाली जाऊन मिसिंग इसमास ताब्यात घेऊन चौकीस आले. पो.उप-निरी. श्री. सचिन निकम यांनी श्री. रूपेश हसोळकर यांचेकडे चौकशी केली असता, चौकशीत त्यांनी सांगितले की, पैश्याची तंगी असल्याने मानसिक त्रास होत होता. तसेच गावाकडे शेती आहे, ती मला पैश्याच्या अडचणीमुळे विकावयाची आहे परंतु भावांचा शेती विकण्यास विरोध आहे. त्याचे देखील मला टेन्शन आले होते. पहाटे ०५.३० वा मी मॉर्निग वॉक करीता घरातुन बाहेर पडलो. विचारा मध्ये मी तसाच आंबेगाव येथील दत्त मंदिरात गेलो. तेथे मी सुमारे २ ते ३ तास बसलो होतो. देवाच्या दारात मन थोडे शांत झाल्यानंतर मी फिरत फिरत वारजे ब्रीज खाली आलो होतो. येथून मी घरीच जाणार होतो. वगैरे मजकूर सांगितला. मिसिंग इसम मिळून आल्याने दाखल करण्यास दिलेली तक्रार दाखल न करणेबाबत पो.ना. किटे यांनी पोलीस ठाण्यास कळविले.

पोलीसांनी अत्यंत तत्परतेने तक्रार नोंदवून तक्रार दाखल होण्यापूर्वी श्री. रूपेश हसोळकर यांचा शोध घेतल्या बाबत सौ. अश्विनी हसोळकर यांनी पोलीसांचे आभार मानून त्यांचे पतीसह आनंदाने चौकीतून गेल्या.